नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ७९ Issue - 79 | वार मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५३ Blow- Tuesday Date 5 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ओबीसी आरक्षण, नवीन प्रभागरचनेसह निवडणुका घेण्याचे सुप्रिम कोर्टाचे आदेश

## नवीन प्रभागरचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळल्या





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रभागरचना आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्दावरुन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. यामुळे अनेक महापालिकांच्या निवडणुका तब्बल चार ते पाच वर्षांपासून रखडल्या आहेत. तिथे प्रशासकीय शासन सुरु आहे. मधल्या काळात कोरोना संकटामुळे या निवडणुका रखडल्या. नंतर ओबीसी आरक्षण आणि प्रभागरचनांच्या कारणास्तव या निवडणुका रखडल्या. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी सुरु होती. अखेर सुप्रीम कोर्टाने याच प्रकरणी आज महत्त्वाचे आदेश दिले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

राज्यात महापालिका, नगर पालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका या जुन्या की नव्या प्रभागरचनेनुसार पार पाडाव्यात? याबाबत अनेक मतभेद होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधीच्या नेतृत्वातील सरकारने नवी प्रभागरचना आखली होती. पण महाविकास आघाडी सरकारने ती प्रभागरचना रद्द करत नवी प्रभागरचना आख-ली. पण नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार अस्तित्वात आल्यानंतर फडणवीस सरकारने आखलेली नवी प्रभागरचना लागू करण्यात आली. त्याला सुप्रीम कोर्टात आव्हान करण्यात आलं होतं. तेव्हा पासून हे प्रकरण न्याय प्रविष्ट होतं. अखेर सुप्रीम कोर्टाने याबाबत महत्त्वाचे आदेश आज दिले आहेत.

महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद निवडणुका नव्या प्रभागरचनेनुसार करण्यास सुप्रीम कोर्टाने मंजुरी दिली आहे. नवीन प्रभागरचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळल्या आहेत. विशेष म्हणजे या निवडणुका ओबीसी आरक्षणासासह घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुका या नव्या प्रभारचनेनुसार असतील.

गेल्यावेळी सुप्रीम कोर्टाचा आदेश आला त्यावेळी कोर्टाने पूर्वी जसं २७ टक्के आरक्षण होतं त्यानुसार निवडणुका घेण्यात याव्यात, असा आदेश दिला होता. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न घटनात्मकदृष्ट्या चॅलेंज केला गेला आहे. तो प्रश्न तसाचा तसा राहील. २७ टक्के आरक्षणानुसार निवडणुका घेण्याचे आदेश कोर्टाने दिले होते. पण प्रभागरचेवरुन वाद होता. नवी प्रभारचना ठेवायची की जुनी ठेवायची? याबाबत वाद होता. अखेर कोर्टाने याबाबत आदेश दिले आहेत.

प्रभागरचना कशी ठेवायची त्याचा निर्णय तिथल्या राज्य सरकारचा असेल. राज्य सरकारने ठरवलेल्या प्रभागरचनेनुसार निवडणुका होतील. तसेच २७ टक्के आरक्षणाला आव्ह-ान देणारी याचिका दाखल करण्यात आली होती. पण त्यावर सुप्रीम कोर्टाने म्हटलं की, याआधीच आम्ही २७ टक्के आरक्षणाने निवडणुका होतील. राज्याच्या निवडणुक आयोगाकडून निवडणुका होतील.

# निर्णायक कसोटीत भारताचा विजय; मालिका बरोबरीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लंडन: भारतिवरुद्ध इंग्लंड कोसटी मालिका सुरु आहे. या मालिकेतील शेवटचा आणि पा-चवा कसोटी सामना ओव्हलमध्ये रंगला. या निर्णायक कसोटीत भार-ताचा विजय झाला आणि मालिका बरोबरीत सुटली. भारताने हा सामना सहा धावाने जिंकला. चौथ्या दिवसापर्यंत साम न्यात आघाडीवर अस-लेला इंग्लंड संघ पाचव्या दिवशी कोसळला. ओव्हल कसोटीच्या शेवटच्या दिवशी टीम इंडियाने इंग्लंड संघाचा ६ धावांनी पराभव केला. यासह, ५ सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत संपली.



शेवटच्या दिवशी इंग्लंडला ३५ धावांची आवश्यकता होती, तर त्यांच्याकडे ४ विकेट शिल्लक होत्या. मोहम्मद सिराजने भारतासाठी शानदार गोलंदाजी केली आणि टीम इंडियाला विजय मिळवून देण्यात तो सर्वात मोठा हिरो ठरला. भारताने शेवटच्या डावात इंग्लंडला ३७४ धावांचे लक्ष्य दिले होते. हा भार-ताचा सर्वात कमी धावांच्या फरकाने विजय आहे. यापूर्वी भारतीय संघाने युवा शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली एजबॅस्टन येथे इंग्लंड संघाचा पराभव केला होता, तर मँचेस्टर कसोटी अनिर्णित राहिली होती.

चौथ्या दिवसाच्या खेळाच्या अखेरीस इंग्लंडने ७६.२ षटकांत ६ विकेट्सच्या मोबदल्यात ३३९ धावा केल्या होत्या. पावसामुळे खेळ लवकर संपवावा लागला. शेवटच्या दिवशी भारतीय संघाला विजयासाठी ४ विकेट्सची आवश्यकता होती, तर इंग्लंडला ३५ धावांची आवश्यकता होती. सामना सुरू झाला तेव्हा प्रसिद्ध कृष्णाने टाकलेल्या पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर जेमी ओव्हरटनने सलग दोन चौकार मारले.

७८व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर, मोहम्मद सिराजचा एक अद्भुत चेंडू जेमी स्मिथच्या बॅटच्या काठावर लागला आणि यष्टीरक्षक ध्रुव जुरेलपर्यंत पोहोचला आणि त्याने तो झेल घेण्यात कोणतीही चूक केली नाही. जेव्हा तिसऱ्या पंचाने जेमीला बाद घोषित केले तेव्हा टीम इंडियाचा जल्लोष पाहण्यासारखा होता. मोहम्मद सिराजने आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट केली. ८० व्या षटकात, त्याने जेमी ओव्हरटनला एलबीडब्ल्यू झेल दिला. येथेही तिसऱ्या पंचाने निर्णय दिला. यानंतर प्रसिद्ध कृष्णाने टंगचे स्टंपला बाद केले.

यानंतर, जखमी ख्रिस वोक्स एका हाताने फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. दरम्यान, गस ॲटकिन्सनने एक शॉट खेळला, जो आकाश दीपला सीमारेषेवर पकडता आला नाही आणि चेंडू सीमारेषेच्या बाहेर ६ धावांसाठी गेला. यानंतर सिराज-ने गस ॲटकिन्सनला बोल्ड केले आणि भारताच्या युवांनी ही मालिका बरोबरीत काढली. सिराजने शेवटची विकेट काढून पंजा पूर्ण केला.

# झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन झाले. नवी दिल्लीतील गंगाराम रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ८१ वर्षांचे होते. किडनीच्या आजारामुळे गेल्या महिन्याभरापासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांच्या निधनामुळे झारखंडमध्ये शोककळा पसरली आहे.

गेले काही दिवस त्यांची प्रकृती नाजूक होती आणि ते व्हेंटिलेटरवर होते. शिबू सोरेन यांचे पुत्र आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. शिबू सोरेन यांच्या निधनाने झारखंडच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



शिबू सोरेन झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य होते आणि त्यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी संघर्ष केला. शिबू सोरेन यांना झारखंडमध्ये 'गुरुजी' म्हणून ओळखले जाते. शिबू सोरेन यांनी स्वतंत्र झारखंड राज्याच्या मागणीसाठी आंदोलन केले. ते तीन वेळा राज्याचे मुख्यमंत्री झाले. शिबू सोरेन यांच्या नेतृत्वाखाली झारखंड मुक्ती मोर्चाने आदिवासी भागांमध्ये सामाजिक आणि राजकीय जागृतीचे अभियान चाल-वले. राज्याला वेगळी आ-ळख मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

शिबू सोरेन यांनी तीन वेळा झारखंडचे मुख्यमंत्रिपद भूषवले. सर्वात आधी २००५ मध्ये दहा दिवसांसाठी (२ मार्च ते १२ मार्च), नंतर २००८ ते २००९ या काळात त्यांनी दुसऱ्यांदा धुरा सांभाळली. त्यानंतर पुन्हा २००९ ते २०१० या काळापर्यंत त्यांनी झारखंडचं मुख्यमंत्रिपद सांभाळलं.

त्यांच्या निधनाची बातमी पसरताच झारखंडमध्ये शोककळा पसरली. राजकीय आणि सामाजिक संघटनांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

गुरुजींचे जाणे हे झारखंडच्या राजकारणातील एका युगाचा अंत आहे. त्यांच्या योगदानाला भावी पिढ्या नेहमीच लक्षात ठेवतील. शिबू सोरेन यांनी झारखंडच्या राजकारणात आणि समाजकारणात मोठे योगदान दिले. आदिवासी समाजासाठी त्यांनी केलेले कार्य नेहमीच स्मरणात राहील. झारखंडला एक नवी ओळख मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. अशा भावना सोशल मीडियावर व्यक्त केल्या जात आहेत.

# वर्षोनुवर्षे प्रकल्प चालवू नका; तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेतल्यानंतर ते वेळेत पूर्ण व्हायला हवेत. त्यामुळे पायाभूत सुविधांचे प्रकल्प वर्षानुवर्षे चालू न राहता ते प्रकल्प हाती घेतल्यानंतर तीन वर्षांत पूर्णत्वास यायला हवेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुख्यमंत्री वॉररुमधील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. तर दूरदृश्यप्रणालीद्वारे विविध विभागांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वॉररुमच्या आजच्या तिसऱ्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ३० प्रकल्पांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला. यापूर्वी झालेल्या दोन बैठकांम ध्ये एकूण ३३ प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला होता. त्यावेळी सुमारे १३५ मुद्यांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या निर्णयांवरील अंम लबजावणीची माहिती यावेळी देण्यात आली.

## मोदी, शहा एकाच दिवशी राष्ट्रपतींच्या भेटीला

## ५ ऑगस्टला अनेक ऐतिहासिक निर्णय

# मोदी सरकार एखादा मोठा घटनात्मक किंवा राजकीय निर्णय घेणार ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: संसदेचं पावस-ाळी अधिवेशन सुरु आहे. ऑपरेशन सिंदूरवरुन गेल्या आठवड्यात जोरदार चर्चा झाली. यानंतर काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती भवनात जाऊन द्रौपदी मूर्मू यांची भेट घेतली. मोदी यांच्या भेटीनंतर चारच तासांनी गृहमंत्री अमित शहा राष्ट्रपती भवनात पोहोचले. त्यांनीही मूर्मू यांची भेट घेतली. मोदी, शहांनी घेतलेली मूर्मू यांची भेट पाहता दिल्लीच्या राजकीय वर्तुळात चर्चांचा उधाण आलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या मूर्मू यांच्या सोबत झालेल्या भेटींबद्दल कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. पण या भेटींनी महत्त्व आहे. सत्त-ेत असलेले दोन सर्वात महत्त्वाचे नेते राष्ट्रपतींच्या भेटीला एकाच दिवशी, अवघ्या चार तासांच्या अंतरानं गेल्यानं राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या आहेत.

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची औपचारिक प्रक्रिया सुरु झालेली असताना मोदी, शहांनी घेतलेली राष्ट्रपतींची भेट महत्त्वाची मानली जात आहे. बिहारमध्ये निवडणूक आयोगानं राबवलेल्या एसआयआर प्रक्रियेवरुन गदारोळ सुरु आहे. या सगळ्या घडामोडींचा ५ ऑगस्टशी नेमका काही संबंध आहे का, याबद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत.





राजकीय विश्लेषकांच्या माहितीनुसार, सरकार महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. जगदिप धनखड यांनी पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिलेला आहे. याबद्दल मोदी, शहांची राष्ट्रपतींशी चर्चा झाली असण्याची शक्यता आहे. सध्या सुरु असलेल्या अधिवेशनात सरकार एखादं महत्त्वाचं विधेयक मांडण्याचीही दाट शक्यता आहे. त्याची माहिती देण्यासाठीच मोदी, शहा यांनी राष्ट्रपतींची भेट घेतसी असण्याची शक्यता आहे.

मोदी, शहांनी घेतलेल्या राष्ट्रपतींच्या भेटीचं कनेक्शन ५ ऑगस्टशी जोडून पाहिलं जात आहे. ५ ऑगस्ट आणि केंद्र सरकारच्या मोठ्या निर्णयांचं कनेक्शन राहिलं आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी मोदी सरकारनं जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाम ुळे जम्मू-काश्मीरची दोन भागांमध्ये विभागणी झाली. यानंतर ५ ऑगस्ट २०२० मध्ये पंतप्रधान मोदींनी राम मंदिराची पायाभरणी केली.

मोदी सरकारनं ५ ऑगस्टला अनेक ऐतिहासिक निर्णय घेत-ले आहेत. त्यामुळे ५ ऑगस्टची तारीख अनेकदा विशेष ठरली आहे. त्यामुळेच मोदी आणि शहांनी ५ ऑगस्टच्या आधी राष्ट्रपतींची घेत-लेली भेट लक्षवेधी ठरली आहे. म ोदी सरकार एखादा मोठा घटनात्मक किंवा राजकीय निर्णय घेऊ शकतं. हा निर्णय राष्ट्रपती पदाच्या पातळीवरील असू शकतो.

संसदेत अनेक संवेदनशील विधेयकं मांडली जाणार असल्याची चर्चा आहे. समान नागरी कायद्याबद्दलचं विधेयक मांडलं जाण्याची शक्यता आहे. उत्तराखंडमधील भाजप सरकारनं सम ान नागरी कायदा लागू केला आहे. आसाम आणि गुजरातमधील भाजप सरकारांनी हा कायदा लागू करण्याची घोषणा केलेली आहे. पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी यासंदर्भात त्यांची भूमिका मांडलेली आहे. समान नागरी कायदा भाजपच्या अजेंड्याचा भाग राहिला आहे. राम मंदिर , कलम ३७० चा विषय मार्गी लागलेला आहे. त्यामुळे आता केवळ समान नागरी कायद्याचा विषय बाकी राहिलेला आहे.

## संपादकीय....

# याचिका फेटाळल्या

राज्यात महापालिका, नगर पालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका या जुन्या की नव्या प्रभागरचनेनुसार पार पाडाव्यात? याबाबत अनेक मतभेद होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधीच्या नेतृत्वातील सरकारने नवी प्रभागरचना आखली होती. पण महाविकास आघाडी सरकारने ती प्रभागरचना रद्द करत नवी प्रभागरचना आखली. पण नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार अस्तित्वात आल्यानंतर फडणवीस सरकारने आखलेली नवी प्रभागरचना लागू करण्यात आली. त्याला सुप्रीम कोर्टात आव्हान करण्यात आलं होतं. तेव्हा पासून हे प्रकरण न्याय प्रविष्ट होतं. अखेर सुप्रीम कोर्टाने याबाबत महत्त्वाचे आदेश आज दिले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रभागरचना आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्दावरुन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. यामुळे अनेक महापालिकांच्या निवडणुका तब्बल चार ते पाच वर्षांपासून रखडल्या आहेत. तिथे प्रशासकीय शासन सुरु आहे. मधल्या काळात कोरोना संकटामुळे या निवडणुका रखडल्या. नंतर ओबीसी आरक्षण आणि प्रभागरचनांच्या कारणास्तव या निवडणुका रखडल्या. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी सुरु होती. अखेर सुप्रीम कोर्टाने याच प्रकरणी आज महत्त्वाचे आदेश दिले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद निवडणुका नव्या प्रभागरचनेनुसार करण्यास सुप्रीम कोर्टाने मंजुरी दिली आहे. नवीन प्रभागरचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळल्या आहेत. विशेष म्हणजे या निवडणुका ओबीसी आरक्षणासह घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुका या नव्या प्रभारचनेनुसार असतील. गेल्यावेळी सुप्रीम कोर्टाचा आदेश आला त्यावेळी कोर्टाने पूर्वी जसं २७ टक्के आरक्षण होतं त्यानुसार निवडणुका घेण्यात याव्यात, असा आदेश दिला होता. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न घटनात्मकदृष्ट्या चॅलेंज केला गेला आहे. तो प्रश्न तसाचा तसा राहील. २७ टक्के आरक्षणानुसार निवडणुका घेण्याचे आदेश कोर्टाने दिले होते. पण प्रभागरचेवरुन वाद होता. नवी प्रभारचना ठेवायची की जुनी ठेवायची? याबाबत वाद होता. अखेर कोर्टाने याबाबत आदेश दिले आहेत. प्रभागरचना कशी ठेवायची त्याचा निर्णय तिथल्या राज्य सरकारचा असेल. राज्य सरकारने ठरवलेल्या प्रभागरचनेनुसार निवडणुका होतील. तसेच २७ टक्के आरक्षणाला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आली होती.

## सत्यभामाबाई वाजे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सिन्नर : तालुक्यातील डुबेरे येथील सत्यभामाबाई विष्णुपंत वाजे ( वय- ८६ वर्ष) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले.सायखेडा येथील जनता इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य रामदास विष्णुपंत वाजे यांच्या त्या मातोश्री होत्या.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली ,सूना व नातवंडे असा परिवार आहे. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड तालुका संचालक शिवाजी आप्पा गडाख यांच्यात भगिनी होत्या. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायण वाजे यांच्या त्या चुलती होत्या.

# शतकातील स्त्री व आव्हाने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोमवार ची गोष्ट ......माझी मुलगी तिच्या मैत्रिणी कडे वाढदिवसानिमित्त गेली होती .खूप उशीर झाला सायंकाळचे सात वाजून गेले ; पण माझी मुलगी नआल्याने माझा जीव कासावीस झाला आणि माझे फोनवर फोन चालू झाले .तेव्हा माझे पती मला म्हणाले 'सातच्या आत घरात 'हा काळ गेला मॅडम !हे एकविसावं शतक आहे .

एकविसावे शतक हे 'भारताच्या कार्यकर्तृत्वाचे शतक 'असे प्रतिपादन संगणकतज्ञ विजय भटकर यांनी केली .अवाढव्य ब्रह्मांडात राहून राहून माणसाने ज्ञान मिळवून वैज्ञानिक दृष्ट्या विचार करण्याची बुद्धी प्रगत करून नवीन तंत्रज्ञानाचे आकलन केले .बुद्धी तेज करण्याचे काम मोबाईल इंटरनेटने केलं आणि विसाव्या शतकाचा उंबरठा ओलांडून एकविसाव्या शतकात प्रवेश केला . एवढं सगळं होऊनही सुरुवातीला माझ्या मनामध्ये जी हुरहुर होती ती माझ्या मनाला शांत बसू देईना आणि त्यातच एकविसाव्या शतकातील स्त्री व आव्हाने यावर लिहावंस वाटलं .स्त्री ही काळानुरूप बदलत गेली .कोणतेही आव्हान हे समस्यांशी निगडित असते आणि समस्यांचे स्वरूप व्यापक होत गेले पण आव्हान तिच्यासमोर कायम आहेच .

प्रत्यक्ष ब्रम्हा, विष्णू ,महेश यांनी माता अनुसया उदरी श्री दत्तात्रयाच्या रूपात जन्म घेऊन तिचे पावित्र्य तिचा उच्चाधिकार सिद्ध केला आहे . गार्गी ,मैत्रीची विद्वत्ता ;सीता द्रौपदीचे पावित्र्य;संत मीरा ,जनाई चा भक्तिभाव ;राणी लक्ष्मीबाई यांचे शौर्य व धूरंधरता ;अहिल्यादेवी चे प्रशासन; जिजाऊ मातेचे राष्ट्रप्रेम; सावित्रीबाई फुले यांची शिक्षण क्रांती; इंदिरा गांधीं चा मुत्सद्दीपणा व बुद्धिमत्ता ; मदर तेरेसा चा त्याग व सेवाभाव ; लता मंगेशकर सुब्बालक्ष्मी यांचा कला व्यासंग ;पी . टी .उषा ,सायना नेहवाल ,पी .व्ही .सिंधू यांचे क्रीडा कौशल्य ; अरुंधती राय यांचे सामाजिक लेखन; कल्पना चावला, सुनीता विल्यम्स यांच आंतराळ साहस; टेस्ट ट्यूब बेबीचे जनक इंदिराअहुजा यादी .....न संपणारी आहे मैत्रिणींनो .कोणतीही क्षमता व क्षेत्र नाही जे महिलांनी पादाक्रांत केले नाही .इतक्या सहजपणे तिला हे यश मिळाल असेल असे वाटते !नाही ;त्यासाठी तिने आनंत मरण यातना सोसल्या . पूर्वी स्त्रियांना वेलीची उपमा दिली जात असे .वेळ उभी राहते ती आधारानेच पण ती कल्पना आज भ्रामक ठरली आहे . ती आज अनेक क्षेत्रात जबाबदारी स्वीकारत आहे . अगदी गृहिणी असो वा नोकरी करणारी सकाळी ८ .०५ ची लोकल पकडण्यापासून स्त्री ही रात्रीपर्यंत दावणीला बांधलेली असते. एवढे करूनही ती वळलळीळेप ारज्ञशी बनवू शकत नाही .



महिला हया त्यागी आणि निस्वार्थी वृत्तीच्या असतात .आयुष्यभर निरपेक्ष भावनेने ती सर्वांच्या सुखासाठी चंदनापरी झिजतात पण ;तिचे हे झिजणे कुणाच्या नजरेत येत नाही .लग्नानंतर पुरुष आपल्या नावामध्ये बदल करत नाहीत पण ; स्त्रिया जन्मदात्याचे नाव बदलून आयुष्यभर पतीचे नाव लावतात आई -वडीलांचे घर त्यागून सासरचे घर आपले मानतात परंतु ;खुद्द पुरुष प्रधान कुटुंब याला पारंपारिक रूढींच्या नावाखाली गोंडस रूप देतात आणि तिच्यावर अनेक बंधने लादतात आणि तरीसुद्धा ही सारी बंधने सहजपणे पेलते कारण ;तिला माहित आहे . . . .

लेकराची माय स्त्रीच ; पतीची अर्धांगिनी स्त्रीच

ज्ञानाची गंगोत्री स्त्रीच ; क्रांतीज्योती सावित्री स्त्रीच

युगाची प्रगती स्त्रीच ; प्रयत्नांची उन्नती स्त्रीच

सृजन काळाच्या वेदना साही ;विश्वाचा उद्धार स्त्रीच

करुणामयीगौरी स्त्रीच ; आदिशक्ती कालीदुर्गा स्त्रीच

तिच्या वाचूनी हे सारे विश्व किती काळ टिकणार . तिच्यामध्ये हे सारे गुण निसर्गने उपजतच दिले आहेत .

स्त्रीलाही आहे उमलण्याचा अधिकार

गाजवू नका तिच्यावर तुमचा व्यभिचार

तोडू नका तुमची संस्कृती पायदळी

ओलांडू नका मानवतेची पातळी

ही आर्त पुकार आहे कोपर्डी येथील अत्याचारग्रस्त निर्भयाची, एकतर्फी प्रेमप्रकरणातून ग्रँड रोड वरील चाकूच्या वाऱ्याने विव्हळत पडलेल्या विद्या देसाईची, जळगावातील खाचक विनयभंगाला बळी पडल्याने पेटवून आत्महत्या करणाऱ्या नववीत शिकणाऱ्या माधुरीची, दिल्लीत शरीराची लक्तरे रस्त्यावर भिरकवली जाऊन जिवंत जळतानाच्या मरण यातना सहन करणार्या डॉक्टर प्रियंका रेड्डीची , बीड मधील कोरोनामध्ये तीन महिन्यांची गरोदर असताना हुंडाबळीच्या अग्निकुंडात जळणाऱ्या मनीषा काळेची, सांगली जिल्ह्यातील डॉक्टर खैरात यांच्या स्त्री भ्रूण हत्येमुळे बळी पडलेल्या स्वाती जाधवच्या ' आई मला वाचव 'म्हणणाऱ्या गर्भातील कन्येची . मानिनी, स्वामिनी, संगिनी, जगतजननी, सखी असणाऱ्या दामिनीला बंदिनी, कालकिनी का बनवलं जातंय ?हेच का एकविसव्या शतकातील स्त्रीयांचे भवितव्य ? आपल्या देशात दर ७८ मिनिटांनी एक हुंडाबळी , ५९ मिनिटांनी एका महिलेवर लैंगिक अत्याचार , दर ३० मिनिटांनी बलात्कार प्रकार , दर १२मिनिटानी एका महिलेवर अत्याचार होत आहेत. अहो भारतीय संस्कृतीत स्त्रीला आपण लक्ष्मी मानतो पण ; तिला आर्थिक सत्ता नाही .मुलीला सरस्वती मानतो पण ; तिच्या शिक्षणावर खर्च करणे आपल्याला भविष्याची गुंतवणूक वाटत नाही .तिला दुर्गेचे रूप मानतो पण ;तिला स्वतःचे मत मांडता येत नाही .भारताच्या महासत्तेचे स्वप्न पाहणाऱ्यांना मला विचारावंस वाटतं की हा भेदभाव कशाला ?आज महिलांनी अनेक शिखरे सर केली आहेत ती चंद्रावर जाऊन पोहचली इतकी पुढे गेली आहे तरी तिला जग समजून घेत नाही समाज तिच्याकडे स्त्री म्हणून नव्हे तर माणूस म्हणून कधी बघणार ?

एकविसाव्या शतकात स्त्रियांना पुढे स्वतःचे स्वातंत्र्य टिकवणे , सत्य विचारांना आपलेसे करण्याचे आव्हान आहे. स्वतंत्र झालेली स्त्री आपल्या समाजात मोकळेपणाने नाही वावरू शकली तर त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याला अर्थ काय ?ती असं वातावरण इच्छिते जिथे तिला तिच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडता येतील. प्रगतीच्या शिखरावर पोहोचण्याची स्वतंत्रता तिला मिळेल तेही तिला ' अभिजात असलेल्या कोमल शरीर कोमल भावना जपत ' पण तिचं अस्तित्व पणाला लावण्याची गरज भासणार नाही. यासाठी तिला गुलाम, कमजोर, असह्य, उपभोगाची वस्तू समजणाऱ्या ' मेल इगो 'असलेल्या स्वतःला पुरुष मानणाऱ्यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे . तिची अस्मिता, आत्मसन्मान, आत्माभिमान राखला गेला पाहिजे. यासाठीआपल्या बाजूने आलेल्या कायद्याचा उपयोग करण्याचे आव्हान तिच्यापुढे आहे . स्त्रियांनी नव्या जमान्याच्या वाळवंटात हरवून जाऊ नका, आपले संस्कार हृदयाशी घट्ट धरून आपण आपली जीवनशैली आखा . स्त्रीची सगळी महती तिच्याकडील प्रेमाची संजीवनी आणि त्यामध्ये दडलेल्या संस्कारात असते हे विसरू नका आणि हेच एकविसाव्या शतकातील स्त्रीयांन पुढील आव्हान आहे . स्त्रीया कमजोर नाहीत हे दाखवून द्यायच आहे आपल्याला .

कमी नका समजू आम्हाला
सर्व क्षेत्री कार्यक्षम आम्ही
सक्षम आम्ही जपतो मुल्ये
वेध घेऊनी भविष्याचा

एकविसाव्या शतकात देशाच्या प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या रक्षणाची जबाबदारी स्वतः घ्यायला हवी . स्त्रीने स्वरक्षणासाठी सज्ज व्हायला हवं यासाठी पुरुषांची मानसिकता बदलावी लागेल .नग्नता , अश्लीलता प्रत्यक्षात नसते तर ती पाहणार्याच्या नजरेत असते . त्यामुळे पुरुषांनी प्रथम स्त्रियांकडे पाहण्याचा आपल्या दृष्टीत आणि दृष्टिकोन यामध्ये बदल करायला हवा आणि तो बदल आपणच घडवायला हवा कारण ;आपल्या रक्षणासाठी कोणी श्रीकृष्ण येणार नाही तर ज्या ज्या वेळी वाढला राक्षसांचा अत्याचार त्यांचा संहार करण्यास आपणच सिद्ध झालं पाहिजे . या सर्व गोष्टींसाठी स्त्रियांनी एकत्र येणे गरजेचे आहे .आपल्यातील शक्तीचा योग्य वापर करून व्यक्तिमत्व साकार करणे हे तिच्या पुढील आव्हान आहे ..स्त्रीने स्त्रीची शक्ती ओळखली पाहिजे .आपल्या अधिकारांसाठी जगणे शिकले पाहिजे. आत्मिक बळ आणि जगण्याची कला अवगत करण्याचे आव्हान तुमच्या समोर आहे. आजची स्त्री सुरक्षित असून चालणार नाही तर ती स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ झाली पाहिजे .आपल्या शक्तीचा वापर करून व्यक्तिमत्व विकास साकार करून ती इतिहास घडू शकते .यासाठी आपण स्त्रीया ह्या एकमेकांच्या शत्रू नाहीत तर सहकारी आहेत तिने समाजाला दाखवून द्यावं .वेळ आली आहे हे दाखवून दयायची की ती जशी करुणारूपीगौरी होऊ शकते तशी रणचंडिका दुर्गा देखील बनू शकते .समाजातील दृष्टी बदलली नाही तरी ऐरण होशील तेव्हा घाव सोस आणि गरज पडल्यास हातोडा होऊन खाऊ घाल. आपल्यातीलआत्मसन्मान, आत्मविश्वास जागृत ठेवा आणि पुरुषप्रधान संस्कृतीला ठणकावून सांगा ध्यानात ठेवा म्हणावं . . ... . .

नवनिर्मितीची प्रेरणा मीच,
अन्यायाचा कर्दनकाळ मीच,
वेदना झेलणारी गौरी मीच,
नराधमांचा संहारी दुर्गा मीच,
माझ्या वाचून ना कुठला शिव,
माझ्या वाचून ना कुठला जीव .

जर मला संपवलं तर तुझं पृथ्वीतलावरील अस्तित्व समाप्त होईल. उठा महिलांनो उठा, तुम्हांला जगायचं आहे, तुम्हांलझगडा यचं आहे, तुम्हांला फुलायचं आहे. या वासनांध नजरेमध्ये झणझणीत अंजन तुम्हाला घालायचं .मैत्रिणींनो आपल्यात प्रचंड आत्मविश्वास आहे गरुड भरारी घेणारी आपली जात आहे . स्त्रीभ्रूणहत्या थांबवून स्त्रियांच अस्तित्व टिकवणे हे आपलं आव्हान आहे. मी यानिमित्त एकविसाव्या शतकात पदार्पण करणाऱ्या सर्व महिलांना सांगू इच्छिते

कवेत घेऊनी आकाश
हो आव्हानावर स्वार
प्रगतीसाठी खुणवी विश्व
ओलांड तू शतकाचे द्वार

धन्यवाद.

**- लेखिका - श्रीम्. सुदर्शना गणपती चौरे (नांदवटे)**

**जिल्हा परिषद मुलींची शाळा शिरवळ, ता .अक्कलकोट, जि. सोलापूर**

**mobile no .** ९४२३४४००९०

# घाण ज्यांनी केली, त्यांनीच ती साफ केली पाहिजे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे साहित्यरत्न, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त घाण ज्यांनी केली, त्यांनीच ती काढली पाहिजे. करिता हक्क मिळविण्यासाठी आमचा लढा चालूच राहील. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८३ व्या व ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त या प्रासंगिक विषयावर १२४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा ३ ऑगस्ट २०२५ ला आयोजित करण्यात आली होती.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपण सर्वांसमोर प्रतिनिधींच्या उपस्थिती विषयी प्रश्नचिन्ह आहे. प्रबोधन कार्यासाठी लोक कमीच उपस्थित असतात. त्या अनुषंगाने १ जुलै १९५४ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, सार्वजनिक कामाचा उमाळा फार थोड्या लोकांना असतो. इतर जन मात्र शेणातल्या किड्याप्रमाणे स्वतःच्या आनंदात मग्न असतात. करिता अशा लोकांना ते शेणातल्या किड्याप्रमाणे जीवन जगत असल्याची सुशिक्षितानी जाणीव करून दिली पाहिजे. ही जाणीव करून देण्याची प्रक्रिया आपण वेगाने गतिमान करू शकलो तर आपल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीचा प्रश्न निकालात निघू शकेल. समाजात नवीन शैक्षणिक धोरण लागू होणे काय? आणि शहरातील गोरगरिबांचे रस्त्यावरील अतिक्रमण पाडणे काय? हे वाईट जरी असले तरी घटना घडल्यावर प्रतिक्रिया देण्यापेक्षा समाजात अनिष्ट घडून नये यासाठी आपण जनजागृती करीत राहिले पाहिजे. स्मिता पाटील मॅडमच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी आपल्या परिवारात विषमता पाहिलेली नसली तरी व्यापक दृष्टिकोनातून विचार करता देशातील राजकारणात, कार्यपालिकेतील विविध कार्यालयात, न्यायालयात, विविध राज्यातील सदनात, केंद्रीय लोकसभा, राज्यसभेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचे प्रतिनिधित्व बहाल केले आहे काय? याची तपासणी केली असता विषमता कुठे आहे? याची आपणास जाणीव होऊ शकेल. ज्यातून विषमतेचे खरे स्वरूप पुढे येईल. तसेच त्यांच्या मते आपण वाईट वर न बोलता फक्त चांगल्या वर बोलत रहावे. हे जरी योग्य वाटत असले तरी वाईटावर वाच्यता केलीच नाही तर मग ते वाईट कसे आहे? हे कसे कळणार? म्हणून चांगले आणि वाईट या दोन्ही अनुषंगाने चर्चा केली पाहिजे. परिणामी वाईट सोडून देता येईल व चांगल्याची कास धरता येईल.

घाण जिथे निर्माण होते, त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसमध्ये असणाऱ्या घाणे विषयी बोलताना म्हणाले होते की, घाण ज्यांनी केली, त्यांनीच ती साफ केली पाहिजे. एवढेच नव्हे तर ज्यांना ते सहन होत नाही, त्यांनी तरी ते तेथे का राहावे? असा प्रश्न उपस्थित करून डॉ. खरे व बाळासाहेब खेर यांच्या भूमिका विषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. ती परिस्थिती आजही आपणाला समाज जीवनात पहायला मिळते. आपल्यातील अनेक तथाकथित पुढारी व्यक्तिगत स्वार्थापोटी प्रस्थापितांसोबत गुलामाप्रमाणे कार्य करत आहेत. ज्यामुळे त्यांना समाजाच्या खऱ्या प्रश्नावर ब्र सुद्धा काढता येत नाही. परिणामी एका काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अधिकारासाठी मंत्रिपदाचा राजीनामा दिला असला तरी मात्र आज लाथ मारल्यावर सुद्धा मंत्रिपद न सोडणारी तथाकथित नेते निर्माण झाली आहेत. या सर्व समस्यावर जनतेला उपायोजना करता यावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सदरील प्रासंगिक विधानावर आपण चर्चा करीत आहोत.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे समन्वयक इंजिनीयर किशोर पाटील म्हणाले की, डॉ. खरे यांच्या सत्कार समारंभात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडणुकी संदर्भात व्यथा व्यक्त करताना म्हणाले होते की, घरच्या भाकरी खाऊन इतरांना सल्ला का द्यावा? असे आमच्या कार्यकर्त्यांना वाटत असले तरी शेजाऱ्यांच्या घराला लागलेली आग कधी आपणापर्यंत पोहोचेल? हे सांगता येणार नाही, म्हणून आपण शेजारधर्म पाळलाच पाहिजे. बाळासाहेब खेर १९३६ ला मुख्यमंत्री झाले तसेच १९४६ ला पण झाले होते. अशा प्रकारे ते तेरा वर्षे मुख्यमंत्री पदावर होते कारण त्यांच्या पक्षाने दिलेल्या आदेशाचे ते तंतोतंत पालन करीत होते. तत्कालीन परिस्थितीत त्यांनी पुण्याच्या शनिवार वाड्यात बैठक घेऊन आपल्या समाजासाठी कार्य करण्याची जाहीर केले होते. ज्याला रयत शिक्षण संस्थेचे भाऊराव गोंडा पाटील यांनी विरोध केला होता. ज्यामुळे त्या शिक्षण संस्थेचे अनुदान बंद करण्यात आले होते. जे गाडगेबाबा यांच्या विनंती करून पुन्हा सुरू करण्यात आले होते.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, हक्क अधिकार मागून मिळत नसतील तर ते हिसकावून घेतले पाहिजेत. कुठल्याही विशिष्ट वर्गाला त्यांचे हक्क अधिकारापासून वंचित ठेवले असेल तर त्यांना ते प्रदान केले पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे आपल्या समाजाने सत्तर वर्षात अतुलनीय प्रगती केली आहे. विविध स्तरावर आजही मोठ्या प्रमाणात भेदभाव पाळला जातो, त्याचा पण नायनाट केला पाहिजे. करिता आपण जागतिक स्पर्धेत उतरले पाहिजे.

यាप्रसंगी उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, आजच्या

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १२४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

संबंधित विषयाची पार्श्वभूमी बघितली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना असे वाटत होते की, त्यांना काँग्रेस मधील घाण काढण्यासाठी बोलावले जाऊ नये. काँग्रेसची वरिष्ठ मंडळी हव्या त्या प्रमाणात लोकशाही राबवू देत नव्हते. प्रतीक पंचशील म्हणाले की, सध्या आपल्या समाजात दोन महत्वपूर्ण घटनांची चर्चा सुरू आहे, ती म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भूषण गवई यांची नियुक्ती आणि परभणी येथे घडलेले सूर्यवंशी प्रकरण याचा विचार करता प्रा. शिवम गायकवाड यांनी भूषण गवई पासून प्रेरणा घेऊन उच्च पदावर विराजमान होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. स्मिता पाटील म्हणाल्या की, त्यांच्या परिवारात त्यांना कधीही विषमता पाळताना पाहायला मिळाले नाही. मात्र आपण अजूनही मुलींना हव्या त्या प्रमाणात स्वातंत्र्य देत नसतो, हे प्रकर्षाने पाहायला मिळते. करिता आपण वाईटावर चर्चा करण्यापेक्षा चांगल्या बाबीवर चर्चा केली पाहिजे. गोविंद कांबळे म्हणाले की, बदलत्या काळानुसार आता महिलांना सर्व क्षेत्रांमध्ये जास्त संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. संग्राम घाटे म्हणाले की, अण्णाभाऊ साठेंचा पोवाडा रशियात गाजला. आता केवळ महापुरुषांचे विचार सांगून चालणार नाही तर आपण काय करीत आहोत? हे स्पष्ट केले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी तर आभार प्रतीक पंचशील यांनी व्यक्त केले. गोविंद कांबळे यांनी झिजला जसा चंदन, माझे तुजला वंदन. हे गीत सादर केले होते. यावेळी कार्यशाळेला स्मिता पाटील, बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, इंजिनीयर किशोर पाटील, उद्योजक शशिकांत काळे, साधू आनंद, एड. विशाल अवचार प्रा. शिवम गायकवाड, गोविंद कांबळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलेच्या गळ्यातील गंठण हिसकावले

सोलापूर, (प्रतिनिधी) : दुचाकीवर आलेल्या दोघा इस्मानी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने दुचाकीवरील मागील बसलेल्या इसमाने फिर्यादी इंदुबाई तानाजी कांबळे (वय-५५,रा. विष्णू मिल चाळ,डोणगाव रोड) यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाचे सोन्याचे गंठण जबरदस्तीने हिसका मारून ओढून घेऊन गेल्याची फिर्याद इंदुबाई कांबळे यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे.हि घटना २ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास डोणगाव रोड भोजप्पा तांडा जवळील असलेल्या कॅनॉल जवळील नागोबा मंदिर येथे घडली.इंदुबाई कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई.कोतवळ हे करीत आहेत.

# जिल्हा लोकशाही दिनात ३४ तक्रारी प्राप्त; तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा प्रशासनाच्या वतीने आज आयोजित जिल्हा लोकशाही दिन कार्यक्रमात नागरिकांकडून एकूण ३४ तक्रार अर्ज प्राप्त झाले. या कार्यक्रमात ३८ अधिकारी व विभागीय प्रतिनिधी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. अभिजीत पाटील यांनी नागरिकांच्या तक्रारी स्विकारून त्या संबंधित विभागांकडे सुपूर्त केल्या. त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना तक्रारींचे त्वरित व परिणामकारक निराकरण करण्याचे निर्देश दिले.



लोकशाही दिन हा नागरिकांच्या अडचणी, तक्रारी व मागण्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या दिवशी सर्व संबंधित विभागप्रमुख व अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य असून, नागरिकांच्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही होणे हा उद्देश आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना लोकशाही दिनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले असून, तक्रारींचे निवारण हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे प्रतीक ठरेल, असे मत श्री. पाटील यांनी व्यक्त केले.

## वागदरीत सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू मुलांना कपडे वाटप कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : हन्नूर गावाचे लोकप्रिय उपसरपंच श्री. सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त वागदरी येथे सामाजिक बांधिलकी जपत एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. बसस्थानक परिसरातील बाजारपेठ येथे गरजू आदिवासी व गोरगरीब मुलांसाठी कपडे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या सामाजिक जाणिवेतून आणि सहृदयतेतून दरवर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. यंदा आदिवासी भागातील गरीब व गरजू मुलांना उपयोगी ठरेल अशा नवीन कपड्यांचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

या उपक्रमाचे आयोजन शाम बाबर - अध्यक्ष, सागरदादा कल्याणशेट्टी युवा मंच, वागदरी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले असून या कार्यात स्थानिक तरुण कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे सदर कार्यक्रम बुधवार, ६ ऑगस्ट सकाळी ११.०० वाजता वागदरी, ता. अक्कलकोट येथे होणार होणार असल्याचे माहिती सागर दादा कल्याण शेट्टी युवा मंच अध्यक्ष शाम बाबर यांनी सांगितले.

# कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक उमेदवारांनी अनामत रक्कम प्राप्त करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर या बाजार समितीच्या संचालक मंडळ निवडणूक सन २०२४-२५ ते सन २०२९-३० साठी दि.२७ एप्रिल २०२५ रोजी मतदान आणि दि. २८ एप्रिल २०२५ रोजी मतम ोजणी घेण्यात येऊन निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात झालेली असून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर या बाजार समितीचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त तालुका म्हणजे उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व सोलापूर शहर असे असल्याने सदरची बाजार समिती ही प्रादेशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गटात मोडत असून सदर बाजार समितीच्या निवडणूकीमध्ये चुरस निर्माण झाल्याने उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व महानगर पालिका हद्दीतील ३१२ व्यक्तींनी वेगवेगळ्या मतदार संघातून नामनिर्देशन पत्र दाखल केलेली होती. निवडणूक पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून दि.०४ मे २०२५ पासून रेखांखीत चेकद्वारे निवडणूक डिपॉझीट रक्कम परत देणेबाबत कार्यवाही सुरू करण्यात आलेली असली तरी अद्याप ९२ व्यक्तोंनी निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्रासोबत भरणा केलेले निवडणूक डिपॉझीट कार्यालयातून स्वीकारलेले नाही.

निवडणूक डिपॉझीट रक्कम परत घेऊन जाण्याच्या अनुषंगाने यापूर्वीही दैनिक वर्तमान पत्रात बातमीद्वारे तसेच बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांद्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात आले होते. तरी ज्या व्यक्तीनी अद्याप निवडणूक डिपॉझीट परत घेतलेले नाही त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर या कार्यालयातील निवडणूक शाखेकडे संपर्क साधुन ओळख पटवून आपला निवडणूक अनामत रकमेचा चेक प्राप्त करून घ्यावा असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी केले आहे.

# स्वेरीच्या तीन विद्यार्थ्यांची 'अदानी सिमेंटस्' बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः 'अदानी सिमेंटस' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या निवड प्रक्रियेतून गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग व एमबीए विभागातील तीन विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

'अदानी सिमेंटस'या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या धनराज साहेबराव घाडगे, प्रशांत हरिदास गायकवाड व सुमित भीमराव जाधव या तीन विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना प्रत्येकी वार्षिक रु. ४.२५ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. अशा नामवंत कंपन्यांमध्ये स्वेरीचे विद्यार्थी दरवर्षी रुजू होत असतात, ही एक विशेष महत्वाची बाब आहे. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे




**मिळाले प्रत्येकी वार्षिक रु. ४.२५ लाखांचे पॅकेज**

प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व त्यांच्या विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून 'अदानी सिमेंटस' या कंपनीत निवड झालेल्या धनराज घाडगे, प्रशांत गायकवाड व सुमित जाधव यांचे अभिनंदन केले.

# साकेगांव येथे महसूल व वन विभाग यांचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महसूल व वन विभाग यांचे दिनांक २९ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार दिनांक १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह आयोजित करण्याबाबत निर्देश प्राप्त झाल्यानुसार राजस्व मंडळ चांधई अंतर्गत साकेगाव येथे सभागृहामध्ये आज दिनांक ४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




शिबिराच्या अध्यक्षस्थानी चिखली तहसीलचे तहसीलदार श्री संतोष काकडे हे होते तर श्रीमती प्रियंका सोनकुसळे अधिकारी मंडळ अधिकारी श्री संजय चौधरी साकेगावच्या सरपंच उर्मिला पवार उपसरपंच मगबूल हिरा खान श्री दिलीप पाटील माजी अध्यक्ष खरेदी विक्री संघ चिखली श्री प्रकाश निकाळजे माजी सभापती पंचायत समिती चिखली जितू निकाळजे देविदास लोखण्डे ग्रामपंचायत सदस्य साकेगाव अंबादास तायडे तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णा जाधव भारत पवार पोलीस पाटील माळशेबा भरत जोगदंडे माजी सरपंच गोदरी विजय धांडे मंडळ कृषी अधिकारी डॉक्टर अनुराधा गारुडे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर स्वप्नील अनाळकर सी ए एच ओ मंडळातील ग्राम महसूल अधिकारी सर्वश्री सुनील डव्हळे संजय डुकरे रुपेश एकडे पियुष गायकवाड कुमारी प्रियंका खरात व महसूल सेवक आरोग्य विभाग. पुरवठा विभाग.संजय गांधी विभाग. कृषी विभाग.अंगणवाडी सेविका आशा वर्कर कर्मचारी म ोठ्या प्रमाणात शेतकरी लाभार्थी हजर होते सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे अध्यक्ष यांनी पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली श्री संजय चौधरी यांनी महसूल सप्ताह व त्या अंतर्गत कारवायाचे कामकाज व महाराजस्व शिबिरात आज महसूल कृषी आरोग्य पंचायत पुरवठा संजय गांधी विभागाने करावयाचे कामकाज बाबत माहिती दिली तसेच मंडळ जिवंत सातबारा मोहीम ॲग्रो स्टार पोखरा असे तर असते संजय गांधी डीबीटी डीसीएल बाबत प्रस्ताविकेमध्ये माहिती सादर केली व सर्व लाभार्थ्यांना तात्काळ पूर्तता करण्याचे आवाहन केले माननीय श्री संतोष काकडे तहसीलदार यांनी तालुक्यात राबवत असलेले जिवंत सातबारा मोहीम नकाशावरील शेतरस्ते मोकळे करणे ग्रीस्टॅग संजय गांधी डीबीटी व डीसीएल करणे बाबत सविस्तर मार्गदर्शन केली तसेच आरोग्य विभाग यांनी आज आरोग्य तपासणी करण्याचे निर्देश दिलेत योजना राबवताना सर्व विभागांनी समन्वय साधून तसेच गावकरी शेतकरी यांना सुद्धा सहकार्य करून योजनेचे फालित प्राप्त करून घेणे बाबत आव्हान केली मंडळ कृषी अधिकारी श्री विजय धांडे यांनी सुद्धा सविस्तर कृषी खात्याच्या योजना व गावकरी शेतकरी यांना सहकार्य यांचे महत्त्व विशद केले श्री संतोष काकडे तहसीलदार चिखली यांनी अमरावती विभाग स्तरावर उत्कृष्ट तहसीलदार म्हणून गौरविण्यात आल्याचे त्यांना जाहीर सत्कार शिबिरामध्ये महसूल मंडळ चांधई च्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच साकेगाव गावकऱ्यांच्या वतीने सुद्धा त्यांचा सत्कार करण्यात आला सदर शिबिरामध्ये जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत सर्व उपयोजना अंतर्गत ७३ सातबाराचे वितरण करण्यात आले तर पुरवठा विभागाकडून नवीन रेशन कार्ड बाबत १५ लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली तसेच ग्रीस्टॅग पिक विमा उत्पन्न डोमिसाईल अशा १६ प्रमाणपत्राचे तर आरोग्य विभागाअंतर्गत ५० लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली तर संजय गांधी विभागांतर्गत २४ लाभार्थ्यांचे आधार व्हॅलीडेशनची कामे केली कृषी विभागातर्फे पी एम किसान च्या १५ लाभार्थ्यांची व्हॅल्युशन केले व उपस्थित शेतकरी यांना हुमणी आळी पीएम किसान संदर्भात मार्गदर्शन केले व एकंदरीत एक उपयोगी असे शिबिर संपन्न झाली सूत्रसंचालन श्री ढवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री संजय डुकरे यांनी केले तर ग्रामपंचायत शिपाई अफसर भाई ग्रामपंचायत ऑपरेटर असलम शेख प्रदीप निकाळजे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मदत केली.

## महापरिनिर्वाण यात्री पुस्तकाचे प्रकाशन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यातून उर्जा मिळते : डॉ. हर्षदीप कांबळे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्टी : आजचे युग हे डिजिटल असुन गुगलवरुन माहिती संकलित करून ती पुढे पाठवली जात आहे. परंतु संशोधन करुन ती माहिती संकलित करणे गरजेचे आहे. महापरिनिर्वाण यात्री या पुस्तकांत तथागत बुद्धाचे ज्या ज्या प्रदेशात भुमीवर पाय लागले बुद्धानी उपदेश केला ती माहिती लेखक अतुल भोसेकर यांनी सुस्पष्टपणे या पुस्तकात मांडणी केली असुन समाजाचे प्रश्न सामुहिक प्रयत्नांमुळेच सोडवता येतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मार्गावरुनच आपण चालत असुन काम करण्याची ऊर्जा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडुन आपल्याला मिळते कधीच थकवा जाणवत नसुल्याचे डॉ. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांनी अतुल भोसेकर पुन्नलिखित महापरिनिर्वाण यात्री या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना व्यक्त केले.

रविवारी ३ ऑगस्ट रोजी फिरोदिया ऑडिटोरियम मध्ये झालेल्या या कार्यक्रमात राज्य प्राप्तिकर विभागाच्या प्रधान आयुक्त डॉ पल्लवी दराडे, बार्टीचे महानिदेशक सुनील वारे, पुणे मनपा उपआयुक्त जयंत भोसेकर, प्रसिद्ध साहित्यिक योगीराज बागुल आणि उद्योजक जगदीश धिवाल, दैनिक सम्राटचे कार्यकारी संपादक इंजि कुनाल बबनराव कांबळे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील बुद्ध लेणींवर संवर्धनाचे काम करणारे अनेक समूह आणि व्यक्तींचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रचंड गर्दी झाली होती.

# आईच्या दुधात पोषक मूल्य असल्यामुळे बाळाचे पोषण होते : डॉ. श्रीकांत येळेगावकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : स्तनपान हे बाळासाठी अमृततुल्य असते. आईच्या दुधात सर्व आवश्यक पोषणमूल्ये नैसर्गिकरित्या उपलब्ध असल्यामुळे ते बाळासाठी कवच-कुंडल्यासारखे कार्य करते, एच.आय.व्ही. संसर्गित मातांनी स्तनपान देताना किंवा पर्यायी दूध देताना ए.आर.टी. विभागातील डॉक्टरांचा सल्ला आवश्यक आहे. गर्भावस्थेत आणि प्रसूतीनंतरही अशा महिलांनी नियमितपणे ए.आर.टी. औषधोपचार सुरू ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे बाळ एच.आय.व्ही. निगेटिव्ह राहण्याची शक्यता वाढते व त्याच्या पोषणाची योग्यरीत्या पूर्तता होते. या वेळी त्यांनी मातांनी आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आणि स्तनपानास प्राधान्य देण्याचे आवाहन




फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग वुईथ एच. आय. व्ही./ एड्स समग्र प्रकल्प सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह निमित्त एच.आय.व्ही. सहज जीवन जगणाऱ्या गरोदर महिला, स्तनदा मातां व बालकांना प्रोटीन पावडर वाटप कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे अध्यक्ष बालमुकुंद राठी, माजी अध्यक्ष अतुल सोनी, सोलापूर शाखेचे सदस्य प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख, समग्र प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक विजय शिंदे, मीनाक्षी रणदिवे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना बालमुकुंद राठी म्हणाले की, नियमित सकस आहार, वेळच्यावेळी तपासणी आणि नियमित औषधोपचार घेतल्यास जन्माला येणारे बाळ सशक्त आणि निरोगी राहते. त्यांनी मातांनी स्वतःच्या आरोग्याबाबत अधिक जागरूक राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमात एच.आय.व्ही. सहजीवन जगणाऱ्या २० गरोदर महिला, स्तनदा मातांना व १० बालकांना कार्यक्रमात प्रोटीन पावडरचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागत विजय शिंदे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन कल्पना गडगडे यांनी केले तर आभार मीनाक्षी रणदिवे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश गायकवाड, आरती रेड्डी, श्रेया पडवळे, बबिता दुपारगुडे, ऋषिकेश चव्हाण, किरण गुंडला, सुवर्णा रुईकर आदींनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात...




### पिण्याच्या मोटारीसह पाईप चोरीस

सोलापूर, (प्रतिनिधी) : हेरिटेज ग्रुप व कोणार्क ॲग्रो कंपनीचे डायरेक्टर कांतीलाल शहा यांच्या मालकीचे हत्तुर येथील गट क्र ५२०/१/अ,५२०/१ब,५२०/२/अ,५२०/२ या शेतातील एक लाख तीस हजार शंभर रुपये किमतीचे पाण्याचे मोटारी पाईप चोरून नेऊन व तसेच लिंबाचे झाड व इतर झाडे तोडून नेल्याची फिर्याद ॲड. रणजीत शामराव पवार (रा.डॉ.कोटणीस नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सागर स्वामीनाथ अंबाडे (रा.अमृत नगर,विजापूर रोड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना जुलै २०२४ ते १५ जुलै २०२५ दरम्यान हत्तुर गाव शेतात घडली. पुढील तपास पोलीस हवालदार हारे हे करीत आहे.

### जबरदस्तीने अनोळखी इसम घरात घुसून घरातून दागिने पळवले

सोलापूर, (प्रतिनिधी) : बाळे स्टेशन सुपाते वस्ती जवळ अज्ञात दोन इसम यांनी फिर्यादी कमल राजाराम सुपाते (वय-७६-,रा.सुपाते वस्ती,बाळे स्टेशन) या घरात असताना दोन अनोळखी इसम हे फिर्यादी यांच्या घरात जबरदस्तीने घुसून घरातील पाच तोळे वजनाच्या दोन हातातील पाटल्या, दीड तोळ्याची गळ्यातील सोन्याची माळ व ३ ग्रॅमची अंगठी असा एकूण ३ लाख ४० हजारांचा ऐवज चोरून नेल्याची फिर्याद कमल सुपाते यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दोन अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हि घटना २ ऑगस्ट रोजी रात्री आठ ते सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास सुपाते वस्ती बाळे स्टेशन येथे घडली. या घटनेचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

# उद्धव ठाकरे, उत्तमराव जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त तांबवे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

## शिबिरात ३२७ जणांची मोफत आरोग्य तपासणी; गरजूंनी घेतला शिबिराचा लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाघोली : शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे आणी माळशिरस चे आमदार उत्तम जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना युवा सेनेच्या वतीने तांबवे या गावामध्ये मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराचे उदघाट्न शिवसेनेचे नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी शिवसेना उपनेते शरद दाद कोळी आमदार उत्तम जानकर माळशिरस तालुक्याचे भाग्य विधाते अकलूज चे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील शिवसेना महाराष्ट्र राज्याचे राज्य संघटक उद्धव कदम डॉ एम के इनामदार शिवसेना जिल्हा प्रमुख संभाजी राजे शिंदे अजय दासरी आशाताई टोणपे पोलीस उपनिक्षक गणेश चौधरी नामदेव वाघमारे संतोष राऊत महादेव बंडगर अनिल बनपट्टे लक्ष्मण डोईफोडे नवनाथ मगर गोरख पवार ई उपस्थित होते.





युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे हे उद्धव जी ठाकरे आणी आमदार उत्तम जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक वर्षी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करीत असतात . याआधी संगम वाघोली या ठिकाणी आयोजन केले होते .या वेळेस तांबवे या गावामध्ये आयोजित केले होते या शिबिरामध्ये ३२७ रुग्णांची आरोग्याची मोफत तपासणी केली .या शिबिरास डॉ एम के इनामदार डॉ धनेश गांधी डॉ विवेक गुजर, डॉ एस एन कुलकर्णी, डॉ समीर बंडगर,डॉ रावसाहेब गुळवे, डॉ श्रीकांत देवडीकर, डॉ विश्वास कदम, डॉ संतोष खडतरे, डॉ निनाद फडे, डॉ विद्या एकतपुरे, डॉ अर्चना गवळी, डॉ सोनाली कटके, डॉ मेधा कदम गायकवाड, डॉ अमोल माने शेंडगे, डॉ स्नेहल इनामदार, डॉ अस्लम शेख, डॉ हर्षवर्धन हाके, डॉ ईर्षद पठाण ई डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली.

या मध्ये धनंजय सैब यांचे कॉलरी मेथड मसाज सेवेचेही आयोजन केले होते .डोळ्यांचे डॉ संकेत गडदे यांनीही डोळ्यांच्या रुग्णांची तपासणी केली .हे शिबीर पार पाडण्यासाठी काका इनामदार निसरभाई खान बाळासाहेब काकडे रवी इनामदार तेजमल कोळेकर दशरथ लवटे शहाजी कदम अशोक कदम नागेश भैय्या जाधव सतीश कोळेकर माऊली लवटे इत्यादिनी हे मोफत आरोग्य शिबीर पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# ग्राहकांच्या हक्कांसाठी पुढाकार : सोलापूरमध्ये दर महिन्याला 'जनता दरबार'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : वैधमापन शास्त्र यंत्रणेच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता वाढविणे, लोकसंपर्क दृढ करणे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे वेळेवर निराकरण करण्याच्या उद्देशाने, सोलापूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'जनता दरबार' आयोजित करण्यात येणार आहे. हा दरबार दुपारी २:०० वाजता उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र कार्यालय, उजनी वसाहत, सोलापूर येथे होणार आहे तरी नागरिकांनी या अनुषंगाने आपल्या तक्रारी द्याव्यात असे आव्हान वैद्य मापन शास्त्र अधिकारी अ. ध. गटमी यांनी केले आहे. या उपक्रमात माहितीचा प्रचार, जनजागृती, हितधारकांचा सहभाग, तक्रारींची नोंद व कार्यवाही यांचा समावेश असेल. वैधमापन शास्त्र अधिनियम तसेच आवेष्टीत वस्तू कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने ग्राहक व जनतेच्या तक्रारी ऐकल्या जातील. फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध तक्रार असल्यास तीही मांडता येईल. सामान्य ग्राहक, ग्राहक संघटना, पॅकबंद वस्तूंचे उत्पादक, पॅकर, आयातदार, किरकोळ विक्रेते, वजन व मापे परवानाधारक उत्पादक, दुरुस्तक व विक्रेते यांनी उपस्थित राहून यंत्रणेच्या कामकाजाविषयी सूचना व अभिप्राय द्यावा, असे आवाहन उपनियंत्रक वैधमापन शास्त्र अधिकारी अ.ध. गेटमे यांनी केले आहे.

# माईर्स एमआयटीच्या ४३ व्या स्थापना दिनानिमित्त गीत विश्वनाथ कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : वैश्विक स्तरावर शैक्षणिक क्षेत्रामध्ये माइल स्टोन ठरलेल्या माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, पुणे, भारत च्या ४३ व्या स्थापना दिन सोहळ्याचे आयोजन दि.५ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ कोथरूड येथील एमआयटी वर्ल्डपीस युनिव्हर्सिटीच्या स्वामी विवेकानंद सभा मंडपामध्ये सकाळी ९.४५ वा. होणार आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी फुलगाव येथील श्रुती सागर आश्रमाचे संस्थापक परमपूज्य स्वामी स्वरूपानंद सरस्वती, गरीबे इन्स्टिट्यूट फॉर सॉफ्ट पॉवर अँड पब्लिक डिप्लोमसी यूएसचे संस्थापक आणि ग्रॅमी पुरस्कार विजेते प्रा. फर्नांडो गरिबे , गरिबे इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष रोनाल्ड सी. गुनेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. संजय देशमुख हे अध्यक्षस्थानी असतील. तसेच एमआयटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी चे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा कराड हे आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित असतील.

या सोहळ्या निमित्त गीत विश्वनाथ , विश्वधर्मी विश्वनाथ शोध विश्वशांतीचा: यात्रा वचनपूर्तीची या विशेष कार्यक्रमाचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ.संजय उपाध्ये लिखित काव्यांचे गीत गायन प्रा. शशांक दिवेकर करतील. तसेच संस्थेसाठी ज्यांनी अमूल्य अशी सेवा दिली अशा निवडक १८ प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कारही करण्यात येणार आहे.

यावेळी माईर एमआयटी, पुणे चे संस्थापक विश्वस्त प्रा.प्रकाश बी. जोशी, कार्यकारी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल व्ही. कराड, अध्यक्ष डॉ.मंगेश टी. कराड, विश्वस्त तुळशीराम दा. कराड, विश्वस्त आणि उपाध्यक्ष डॉ. वीरेंद्र एस. घैसास, व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.सुचित्रा नागरे, विश्वस्त आणि सचिव प्रा.स्वाती एम. चाटे, विश्वस्त आणि खजिनदार डॉ.सुनील के. कराड, विश्वस्त आणि उपाध्यक्ष प्रा.ज्योती ढाकणे यांची विशेष उपस्थिती असणार आहे अशी माहिती संस्थेचे कुलसचिव डॉ रत्नदीप जोशी यांनी दिली. तसेच हा कार्यक्रम ऐशी हजार विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून पाहता येणार असून सर्व विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि नागरिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

# चिंबीपाडा आदिवासी क्षेत्रात उपजिल्हा रुग्णालय मागणीसाठी निदर्शने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील कांबा ते चिंबीपाडा या दरम्यानं चिंबीपाडा येथे असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याच्या मागणीसाठी भिवंडीत उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर आर पी आय सेक्युलरच्या वतीने तालुका युवक अध्यक्ष अजिंक्य गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अँड किरण चन्ने, पंचायत समिती माजी सभापती श्रीधर खारीक, संजय वारघडे, दत्ता शिकारी, आतिश कदम, अंकुश पाटील यांसह पंचक्रशीतील पंचक्रोशीतील अनेक नागरिक सहभागी झाले होते.




भिवंडीतील पारोळ रोड या दुर्गम व विस्तृत भागा मध्ये एकही खाजगी रुग्णालय नाही,प्राथमिक आरोग्य केंद्र चिंबीपाडा हा एकमेव पर्याय येथील नागरिकांना आहे,परंतु येथील नागरिकांना उपचारासाठी भिवंडी येथे पोहचण्यासाठी सुमारे एक तासाहून अधिक काळ लागतो.येथील लोकसंख्येचा विचार करीता प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णसेवा अपुरी पडत असल्याने येथे उपजिल्हा रुग्णालयाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन अजिंक्य गायकवाड यांनी केले.

विशेष करून गरोदर महिलांसाठी उपचारासाठी करावा लागणारा प्रवास जीवघेणा झाला आहे.

सर्पदंश झालेले रुग्ण सुद्धा मोठ्या प्रमाणात या भागात आढळतात. शिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे पावसाळ्याच्या दिवसात पूरस्थितीत कांबे गावा जवळील रस्ता हा संपूर्णपणे पाण्या खाली जातो,अशावेळी भिवंडी शहराकडे जाण्याचा पर्यायी रस्ता उपलब्ध नसतो, त्यामुळे मोठी अडचण निर्माण होऊन अशा परिस्थितीत शासनाने मागणीचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी आर पी आय सेक्युलर पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अँड किरण चन्ने यांनी केली आहे.

चिंबीपाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपांतर ग्रामीण रुग्णालयात करावे,वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन भिवंडी ग्रामीण भागा साठी स्वतंत्र आरोग्य यंत्रणा उभी करावी,

रुग्णवाहिका सेवा या भागात शासनाने सदैव उपलब्ध करून द्यावी,तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचा दर्जा सुधारावा अशा मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी अमित सानप यांना सुपूर्द केले.

# डास निर्मूलनासाठी खंडाळा देवी इथे धूर फवारणी करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील तहसील कार्यालय मेन पॉइंटवर असलेलं गाव खंडाळा (देवी) गावात सध्या वाढलेला डासांचा प्रादुर्भावामुळे डेंगू आजाराचा धोका निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे याला आळा घालण्यासाठी गावात तात्काळ धुरफवारणी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गावातील नागरिक पत्रकार गजानन कडूजी राऊत यांनी ग्रामपंचायत खंडाळा देवी यांच्याकडे प्रसिद्धी पत्रकाराद्वारे केले आहे अलीकडील पावसामुळे नाल्यात व घराभोवती गवताची वाढ होत आहे या मध्ये पाणी सासले असून त्यामुळे डासाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे दुर्गंधीमुळे सामान्य नागरिकांच्या आरोग्यावर देखील परिणाम होत आहे डासांचा परिणाम होऊ नये म्हणून व आरोग्याच्या तक्रारी वाढुनये म्हणून धूरफवारणी करण्याची गरज आहे व डासांचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे लहान मुलांचे व ज्येष्ठांचे आरोग्य धोक्यात यायची शक्यता आहे गावातील , ठिकठिकाणी डासांचे परिणाम दिवसेंदिवस होत आहे गल्ली व पडीत जागा असलेला ठिकाणी घाण पाणी होत आहे



### गजानन राऊत यांचे ग्राम पंचायत सचिव यांना निवेदन

अनेक ठिकाणी सांडपाणी सरळ वाहून जात नाही पाणी तुंबल्याने मोठ्या प्रमाणात डासाचं आगमन व दुर्गंधी वाढत आहे , यामुळे साथीचे आजार वाढण्याची भीती निर्माण झाली आहे शिवाय मलेरिया डेंग्यू या सारख्या साथीचे रोग पसरू नये डेंगू सारखा रोगांचा थैमान घालू नये यासाठी लहान मुलं वयस्कर नागरिकांसाठी शारीरिक व मानसिक धोका निर्माण होऊ नये म्हणून फॉगिंग मशीनद्वारे संपूर्ण गावात धूरफवारणी करावी पावसामुळे गावात ठिकठिकाणी गवत ही मोठ्या प्रमाणात वाढलेले असून त्यामुळे साप व इतर कीटकांचा धोका निर्माण होत आहे दूरफवारणी बरोबरच या ठिकाणी तननाशक औषधी फवारणी व्हावी अशी मागणी गजानन कडुजी राऊत यांनी ग्राम पंचायत खंडाळा (देवी)सरपंच व ग्रामसेवक अधिकारी यांच्याकडे केली आहे.

## शिवसेनेकडून पंढरपुरात चव्हाण यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध

# भगवा आतंकवाद सांगणाऱ्या माजी मुख्यमंत्र्यांचा निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : हिंदू धर्माचा अपमान करणारे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या विधानाचा तीव्र निषेध करण्यात आला. आज महाराष्ट्र चे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते मा.श्री.एकनाथजी शिंदे साहेब व खासदार मा.श्री. श्रीकांत शिंदे साहेब व युवासेना कार्यअध्यक्ष मा.श्री.पुर्वेश भाई सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेनेचे सचिव - किरण दादा साळी, राहुलदादा लोंढे मार्गदर्शनाखाली पंढरपूर (छ शिवाजी महाराज चौक)जि.सोलापूर येथे पृथ्वीराज चव्हाण यांचा जाहिर निषेध करण्यात आला. पृथ्वीराज चव्हाण यांनी हिंदु धर्माची माफी मागावी आशी घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी सोलापूर लोकसभा संपर्क पप्रमुख महेश नाना साठे, शिवसेना सहसंपर्क प्रमुख सुभाष साळुंखे, युवासेना(युवती) कार्यकारणी सदस्य प्रियांका परांडे, उपजिल्हाप्रमुख साईनाथ बडवे, युवासेना तालुका प्रमुख महादेव भोसले, सनी असंगे, युवती विधानसभा प्रमुख पल्लवी जन्मले, तालुकाप्रमुख स्नेहा सिंडोल,सुमित शिंदे, कामगार सेना तालुका प्रमुख उषा मुळे, संभाजी सातव, विश्वजीत मुन्ना भोसले, श्रीकांत वागज, अविनाश शेटे,सोमनाथ लोखंडे, गणेश गावणधारे, अभिमन्यू गायकवाड,यल्लप्पा चंदनवाले, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष सागर गोडसे, बिरुदेव पारेकर साहेब शेतकरी सेना जिल्हा उपाध्यक्ष, अमोल देशमुख पंढरपूर तालुकाध्यक्ष, शेतकरी सेना लक्ष्मण तात्या वंजारी, तालुकाप्रमुख संतोष धोत्रे, नेते तानाजी जाधव, जयंत टकले, पप्पू गायकवाड, श्रीकांत वाघज, अविनाश शेटे, आकाश भैया शिंदे, सुधीर मुसळे, गणेशदास परदेशी मा नगरसेवक रणजित पवार युवासेनाचे पदाधिकारी उपस्थित होते.

हिंदु धर्माला अतंकवादयाशी जोडणाऱ्या आशा लोकांविरुध्द युवासेनेचे-शिवसेनेचे कायम स्वरूपी अंदोलन चालु राहील.



# राज्य शासनाकडून शिरोळ तहसिलदारांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : शिरोळ येथील तहसील कार्यालयाचे आदर्श व कर्तव्यदक्ष तहसीलदार मा अनिलकुमार हेळकर (साहेब) यांना राज्य शासनाने कोल्हापूर जिल्ह्यातून आदर्श तहसीलदार पुरस्कार देऊन गौरव केला आहे. या अभिनंदनीय निवडीबद्दल आदरणीय हेळकर (सर ) यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.